
# १. चित्र

## १.१ गिरगिटणे





## माझी कृती


रेषा गिरगिटताना होणाऱ्या हातांच्या व डोळ्यांच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, तोंडाने गुणगुणणे या सर्व गोष्टी सुंदर लयदार रेषांची निर्मिती करण्यास मदत करतील. मनाप्रमाणे गिरगिटण्यास सांगावे व त्यामधील काही भागांमध्ये रंग देण्यास सांगावे.




## माझी कृती

## १.२ ठिपक्यांची मजा


- आकार




- चित्र



## माझी कृती






**ठिपक्यातून आकार :** कागदावर काही अंतरावर दोन ठिपके घेऊन ते एक किंवा दोन रेषांनी जोडल्यास नवीन आकार तयार होतो. दोन ठिपक्यांप्रमाणेच तीन, चार, पाच, सहा किंवा त्यापेक्षा जास्त ठिपके घेतल्यास सहज सोपे आकार तयार होतील. असे आकार विद्यार्थ्यांना मित्रांसोबत गटात तयार करता येतील. तयार होणारे आकार आवडीच्या रंगाने रंगवण्यास सांगावे.

**ठिपक्यातून चित्र :** एका कोऱ्या कागदावर हवे तितके ठिपके काढून ठिपक्यांना जोडून कोणकोणते आकार तयार करता येतील ते शोधून काढण्यास सांगावे. तयार झालेल्या चित्रास आवडीच्या रंगाने रंगवण्यास सांगावे.


## १.३ गंमत रेषेची




## माझी कृती


दिलेल्या रेषांचा सराव केल्याने सुंदर रेषा काढता येते व त्यामुळे सुंदर चित्र काढण्यास मदत होते. वरील रेषांच्या सरावासाठी पेन्सिल, तेलकट खडू, स्केचपेन, मार्करपेन, पेन इत्यादींचा वापर करता येईल.

## १.४ सोपे आकार



## माझी कृती





वरील काही सोप्या चित्रांचे निरीक्षण करून अशाच पद्धतीने आणखी काही वेगळी चित्रे काढण्यास सांगावे.

## १.५ ठसेकाम




## माझी कृती



मुलांना रंगांशी खेळायला आवडते. रंग किंवा शाई बोटाला लावून कोऱ्या कागदावर ठसे उमटवावेत. ठशांच्या मदतीने छान चित्रे तयार करून घ्यावीत. ठशाच्या आकारात विशिष्ट चित्राचा आकार शोधून तो काढण्यास सांगावे.

## १.६ नक्षीकाम




## माझी कृती

पाने, फुले, वर्तुळ, त्रिकोण, नागमोडी रेषा पाहून नक्षीकाम करता येईल. यामध्ये वरील नक्षीकाम पूर्ण करणे अपेक्षित आहे. माझी कृतीमध्ये यापेक्षाही वेगळी नक्षी तयार करून घेता येईल.

## १.७ रंगकाम




## माझी कृती



दिलेल्या फुग्यांत व पतंगाकृतीत आवडीप्रमाणे विविध रंग भरण्यास सांगावे.

## १.८ सुलेखन



अक्षर सुंदर येण्यासाठी लहानपणापासूनच सराव होणे आवश्यक आहे. शब्दांचे चित्र म्हणजेच ‘अक्षर’ होय. चित्र हे रेषेने तयार होते. रेषा सुंदर आली की अक्षर सुंदर होते! सरळ आडवी रेषा, सरळ उभी रेषा, तिरपी सरळ रेषा, गोलाकार रेषा व अर्धवर्तुळ रेषांचा व्यवस्थित सराव केल्यास अक्षर सुंदर होण्यास मदत होईल.

# १.९ माझ्या मित्रांची चित्रे



R8H4E8

चित्रांत चुका काढू नयेत. चित्रांतील भावना ओळखाव्यात कारण ती चित्रे म्हणजे मुलांची स्वनिर्मिती असते.

## १.१० माझी चित्रे

वरील जागेत आवडीनुसार चित्रे काढावयास सांगावीत.